महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर

ता.वाळवा, जि. सांगली

## विश्व हिंदी दिवस अहवाल

### “विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी विषयावर व्याख्यान ”

दिनांक 10.01.2025

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर मध्ये शुक्रवार दिनांक 10 जानेवारी 2025 रोजी हिंदी व वाणिज्य विभागाद्वारे ‘विश्व हिंदी दिवसाचे औचित्य साधून ‘बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी’ याविषयावर बँक ऑफ महाराष्ट्र शाखा इस्लामपूरचे प्रबंधक मा. अभिषेक राज यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला व वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता मा. संतोष नांगरे हे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना त्यांनी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना बँकेत शिपाई ते क्षेत्रीय अधिकारी आशा विविध पदावरती नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगून त्याकरिता आवश्यक पात्रतांबाबत विद्यार्थ्यांची दिलखुलास चर्चा केली. विद्यार्थ्यांनी देखील मोठ्या उत्सुकतेने चर्चेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी बँक क्षेत्राशी संबंधित विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे देत असताना बँक खात्याचे प्रकार, विविध टॅक्स, एटीएम कार्डचे प्रकार, यूपीआय वापराचे फायदे युपीआय वापरत भारत देश सर्वात अग्रेसर असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. संतोष नांगरे यांनी बँकांचे विविध प्रकारांची माहिती देत विविध व्यवसायासाठी बँकांकडून मिळणाऱ्या विविध कर्जांविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा इस्लामपूरचे मा. श्रीहरी देवरकोंडा व कॉलेज मधील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक संदीप पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. जाविद शेख यांनी केले तर आभार हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी कॉलेजचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## “विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी विषयावर व्याख्यान ”




**विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी विषयावर मार्गदर्शन करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश आठवले**




**विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी विषयावर मार्गदर्शन करताना बँक ऑफ महाराष्ट्र इस्लामपूरचे शाखाधिकारी श्री. अभिषेक राज**



**उपस्थित विद्यार्थी**




**अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्रा. संतोष नांगरे**

# बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी : अभिषेक राज

**इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा**

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना बँकेत शिपाई ते क्षेत्रीय अधिकारी अशा विविध पदांवर नोकरीच्या संधी आहेत. त्यासाठी आवश्यक पात्रता मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रच्या इस्लामपूर शाखेचे प्रबंधक अभिषेक राज यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये 'बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी' या विषयावर ते बोलत होते. विश्व हिंदी दिवसाचे औचित्य साधून हिंदी व वाणिज्य विभागाद्वारे या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कला व वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. संतोष नांगरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. जाविद शेख यांनी प्रास्ताविक केले. हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी आभार मानले. प्रा. अश्विनी थोरात यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या इस्लामपूर शाखेचे श्रीहरी देवरकोंडा, वाणिज्य विभागाचे प्रा. संदीप पाटील यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.



**इस्लामपूर : 'बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी' या विषयावर अभिषेक राज यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. संतोष नांगरे, डॉ. प्रकाश आठवले व श्रीहरी देवरकोंडा उपस्थित होते.**

**कर्मवीर महाविद्यालयात व्याख्यान**

---

दैनिक जनप्रवास

## थोडक्यात....



**▮ बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करताना अभिषेक राज, मंचावर प्रा.संतोष नांगरे, प्रा.डॉ.प्रकाश आठवले, श्रीहरी देवरकोंडा आदी.**

# विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी : अभिषेक राज

**जनप्रवास । इस्लामपूर**

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना बँकेत शिपाई ते क्षेत्रीय अधिकारी आशा विविध पदावरती नोकरीच्या संधी अजूनही आहेत. त्यासाठी आवश्यक पात्रता मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करण्याची खरी गरज आहे. असे मत बँक ऑफ महाराष्ट्र शाखा इस्लामपूरचे प्रबंधक अभिषेक राज यांनी व्यक्त केले. येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये 'बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी' याविषयावर ते बोलत होते. विश्व हिंदी दिवसाचे औचित्य साधून हिंदी व वाणिज्य विभागाद्वारे या व्याख्यानाचे आयोजन केले होते. कला व वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता संतोष नांगरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. बँक खात्याचे प्रकार, विविध टॅक्स, एटीएम कार्डचे प्रकार, यूपीआय वापराचे फायदे, यूपीआय वापरत भारत देश सर्वात अग्रेसर असल्याचे तपशिलवार माहिती अभिषेक राज यांनी माहिती दिली. संतोष नांगरे यांनी व्यवसायासाठी बँकांकडून मिळणाऱ्या विविध कर्जाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्र इस्लामपूरचे श्रीहरी देवरकोंडा व वाणिज्य विभागाचे प्रा. संदीप पाटील व कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. जाविद शेख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. अश्विनी थोरात यांनी सूत्रसंचालन केले. हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रकाश आठवले यांनी आभार मानले.